रे.दि.मु.नं. ८८/२०१७

नि. ५० ची पुरवणी

**शपथेवर पुढील सरतपास प्रतिवादी क्र २ व ३ तर्फे श्री.ए के शिंदे वकिल**

१०. शपथपत्रातील सर्व मजकुर, मी वाचला आहे. तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. शपथपत्र नि.५० देण्यात आलेले आहे.

**उलटतपास वादीतर्फे ॲड आर एम चव्हाण वकील**

११. मी माझा जबाब मारुती रामचंद्र गार्डे याचे वतीने देत आहे. त्यांनी मला मुखत्यारपत्र करुन दिलेले आहे. मारुती गार्डे हे मयत आहेत.

१२. दावा मिळकत ही रामचंद्र धोंडीबा कुदळे व कृष्णात धोंडीबा कुदळे यांचे मालकीची होती. त्यांना ही मिळकत त्यांचे वडीलांकडुन मिळलेली आहे. दावा मिळकतीचा मुळ सर्वे क्रमांक मला माहित नाही. जुन्या सर्वे क्रमांकाचे क्षेत्र ३९.०० आर एवढे होते. जुन्या सर्वे क्रमांकाचे नवीन गट क्रमांक १३६९ असा पडला. वादीने सदरचा दावा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. मारुती गार्डे यांनी दतात्रय कुदळे व इतराविरुध्द सातारा येथील न्यायालयात रे.दि.मु.नं. ३६३/२००६ हा दावा दाखल केलेला होता. त्या दाव्यातील निकालाविरुध्द मा.जिल्हा न्यायालयात अपील दाखल झाले होते. त्या अपीलाचे निकालाची मला माहिती आहे. त्या निकालानुसार मालकी वादींची व कब्जेवहिवाट आमची आहे असा निष्कर्ष न्यायालयाने नोंदविला होता. त्या निकालाविरुध्द मारुती गार्डे यांनी मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. त्या अपीलाचे प्रलंबन काळात मारुती मयत झाल्याने त्यांचे वारस म्हणुन आम्ही हजर झालो.

मा. उच्च न्यायालयाने मा. जिल्हा न्यायालयाचे आदेशास स्थगीत दिलेली नाही. मारुती रामचंद्र गार्डे यांना केवळ एकच मुलगी प्रतिवादी क्र. १ हीच आहे. ती त्यांची कायदेशीर वारस आहे. मा.दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, सातारा या न्यायालयात आम्ही मृत्यूपत्रानुसार प्रोबेट मिळणेसाठी प्रकरण दाखल केले आहे. त्याचा अदयाप निकाल झालेला नाही. रे.दि.मु.नं.३६३/०६ व प्रस्तुतच्या दाव्यातील मारुती गार्डे यांनी दाखल केलेली कैफियत मी वाचलेली आहे. या दोन्ही कैफियतीमध्ये मारुती यांनी आमचे नांवे मृत्यूपत्र करुन दिल्याचा उल्लेख नाही. वादी व मारुती गार्डे यांचेमध्ये दावा मिळकतीबाबत काय व्यवहार झाले याची मला माहिती आहे. त्यांचेमध्ये कोणत्या कागदपत्रावरुन अथवा दस्तावरुन वाद सुरु होता याबाबत मला सांगता येणार नाही.

१३. मारुती गार्डे यांच्या मृत्यूनंतर मृत्यूपत्रानुसार आमचे नावाची नोंद व्हावी यासाठी, मी ग्रामपंचायत व तलाठी यांचेकडे अर्ज दिला होता. तथापि, आमचे नावाची नोंद अदयाप झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र १ मंगल यांनी दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क अधीकार येत नाही हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मारुती यांनी त्यांचे मृत्यूपूर्वी दि १६.०५.२००८ रोजी मृत्यूपत्र करुन ठेवले व ते त्यांनी दि.२८.०८.२००८ रोजी नोंदणीकृत केले हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील परीच्छेद क्र ४,५, ६ व ७ मधील सपुर्ण मजकूर खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा दावा खोटा व लबाडीचा आहे हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा दावा मुदतीत नाही हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही आम्ही प्रतिवादी क्र २ व ३ व आमचे पुर्व हक्क दार मारुती हे मालकी हक्काने वादीची मालकी नाकारुन स्वतः मालक म्हणुन वहिवाटत आहेत हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सरतपासात खोटी विधाने

रे.दि.मु.नं. ८८/२०१७

**नि. ५० ची पुरवणी**

केलेली आहेत. मी आजपर्यन्त या न्यायालयात मुळ मृत्यूपत्र हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत**

**(डी.आर.माळी )**

**दिनांक :- ११/०३/२०२२** **सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर,वाई**